# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर

## प्रकल्प विभाग (PMAY2.0)

जा.क्र.प्रवि/ / PMAY2.0/२०२५

दिनांक /०१/२०२५

अहिल्यानगरी मधील तमाम शहरवासीयांना जाहीररित्या सूचित करण्यात येते कि,१५/१०/२०२४ च्या शासननिणर्यानुसार दिनांक १/०९/२०२४ पासुन महाराष्ट्र राज्यात प्रधांन मंत्री आवास योजना (शहरी ) २.० राबविण्यात येत आहे. "प्रधानमंत्री आवास योजना(शहरी) २.० अंतर्गत पुढील प्रमाणे चार घटकांचे समावेश असेल

| क्रं. | घटकांचे नांव | तपशिल |
|---|---|---|
| १. | व्यक्तीगत स्वरुपात घरकुल बांधण्यास अनुदान Beneficiary Led construction(BLC) | ज्या लाभार्थ्यांच्या नावावर जागा असेल अशा लाभार्थ्यांकरिता |
| २. | भागीदारी तत्वावर परवडण्या-या घरांची निर्मिती Affordable Housing in Partnership (AHP) | शासकीय जमिनीवर गृहनिर्माण प्रकल्प अथवा खाजगी जमिनीवर विकासकाव्दारे गृह प्रकल्प |
| ३. | भाडेतत्वावर परवडणा-या घरांची निर्मिती Affordable Rental Housing (ARH) | शासकिय जमिनीवरील गृह प्रकल्प /खाजगी विकासकाव्दारे लाभार्थ्यांना तत्वावर परवडणारे घरे |
| ४. | व्याज अनुदान योजना Intrest Subsidy Scheme(ISS) | मे. केंद्रशासन व बँक यांचेशी संबंधीत |

त्या अनुषंगाने अहिल्यानगर महानगरपालिकेच्या हददीत **"प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत लाभ घेण्यासाठी पात्रतेचे निकष खालील प्रमाणे आहे.**

१. लाभार्थी कुटूंबामध्ये पती-पत्नी व अविवाहित (वय वर्ष १८ वरील )मुले/मुली यांचा समावेश असेल.

२. या योजने अंतर्गत अनुदान/सहाय्य प्राप्त करुन घेण्याकरिता शहरी भागात राहणा-या EWS/ LIG /MIG कुटूंबातील कोणत्याही सदस्यांच्या नावावर देशाच्या कोणत्याही भागात पक्के घर नसावे.

३. लाभार्थ्याने गेल्या २० वर्षात कोणत्याही शासकीय घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

४. योजने अंतर्गत बांधण्यात येणारी घरे कुटूंबातील कर्त्यामहिलेच्या किवा कर्त्या पुरुष व महिला यांचे संयुक्त नावावर असतील.

५. आर्थिक दुर्बल घटकांसाठी ३ लक्ष इतकी कमाल वार्षिक उत्पन्न मर्यादा राहील. (अर्जदाराचा चालू वर्षाचा तहसिलदार यांचे उत्पन्नाचा दाखला असणे आवश्यक आहे.)

६. स्वत:च्या नावाने व कुटूंबातील आधारकार्ड लिंक असलेले बॅक खाते (बॅक पासबुक)असावे.

७. जात प्रमाणपत्र (SC,ST किंवा OBC) लाभार्थीसाठी आवश्यक आहे.

अहिल्यानगर महानगरपालिका हददीतील नागरिकांना अर्ज भरण्याकरता आवाहन करण्यात येते कि, पात्र लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रे सोबत घेवून प्रकल्प विभाग, शहरस्तरीय तांत्रिक कक्ष, (CLTC)प्रधानमंत्री आवास योजना, **नविन प्रशासकिय इमारत, छ.संभाजीनगर रोड, अहिल्यानगर** महानगरपालिका, येथे भेट दयावी, व संबंधित घटकातील योजनेचे युनिफाईड वेब पोर्टलवरील **(https:// pmaymis. gov.in /PMAYMIS2_2024 /Pmay.Default. aspx)** लाभार्थी यांनी स्वत:हा उपस्थित राहून फॉर्म भरून मनपात नोंदणी करणे आवश्यक आहे.

आयुक्त तथा प्रशासक